झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, से.बापट रोड,पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/तां.१/झोपुआ/प्र.क्र.२०१/८५५/२०१५
दिनांक : २८।५।२०१५

## "झोपडपट्टी पुनर्वसन आदेश"

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे सोयीकरिता 'उपरोक्त अधिनियम' असा करणेत येत आहे) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो.पु.यो-२००४/प्र.क्र.-२१३/झो.प.सु-१ दि. ३०/६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे आणि आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना उक्त प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून प्राधिकृत केले आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुर्दीनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. ०१/१२/२००५ रोजी अंतिमतः प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

"सत्यप्रत"
उप अभियंता
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे

आणि ज्याअर्थी, उपरोक्त उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी विकसक मे. नाईकनवरे असोसिएट्स यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि. १७/११/२०१४ रोजी प्रस्ताव दाखल केलेला आहे.

आणि ज्याअर्थी, मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा. यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ च्या कलम ३ (वाय) मधील तरतूदीनुसार झोपडपट्टीचे सर्व्हेक्षण करुन झोपडपट्टीधारकांची पात्रता निश्चित करुन त्याबाबतची अंतिम यादी (परिशिष्ट - २) तयार करण्याचे अधिकार उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांना प्रदान केलेले आहेत. त्या अनुषंगाने या जागेवरील झोपडपट्टीचे सर्व्हेक्षण करुन झोपडीधारकांची पात्रता यादी (परिशिष्ट - २) हे उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील झोपडीधारकांची पात्रता दि. १२/०२/२०१५ रोजीच्या परिशिष्ट-२ अन्वये निश्चित केलेली आहे.

सदर अंतिम यादीच्या गोषवाऱ्याचे अवलोकन करता सदर जमिनीवर एकुण ७६ झोपडया असून त्यापैकी निवासी ५४ व बिगर निवासी ८ झोपडीधारक पात्र ठरलेले आहेत. असे एकुण ६२ पात्र झोपडीधारकांपैकी ५७ झोपडीधारकांनी झोपडपट्टी

पुनर्वसन राबविण्यासाठी संमती दिलेली आहे. पात्र झोपडीधारकांपैकी सुमारे ९०.४७% झोपडीधारकांनी झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी विकसकास संमती दिलेली आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने व ती घोषित नसलेमुळे क्षेत्रिय अधिकारी, उप आयुक्त परिमंडळ १, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र. ६८ दि. २२/०४/२०१५ अन्वये झोपडपट्टी सदृश परिस्थितीबाबतचा अहवाल सादर केला असलेमुळे सदरचे क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनिय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी मी कुणाल कुमार, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास ) अधिनियम १९७१ चे कलम ३ क (१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये अनुसूचित नमुद केलेले क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे.

सदरच्या आदेशामुळे बाधित होणा-या कोणत्याही व्यक्तिस आदेश प्रसिध्द झाल्यापासून चार आठवडयांच्या आत महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास ) अधिनियम १९७१ च्या कलम ३ क (२) अन्वये विशेष न्यायाधिकरणाकडे अपील दाखल करता येईल आणि विशेष न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम राहील.

**<u>अनुसूची</u>**

| जमिनीचा तपशील | क्षेत्र ( चौ. मी.) | चतु:सिमा |
|---|---|---|
| सि.स.नं. ११०८, फा. प्लॉ. क्र. ४८७ (पार्ट), शिरोळे वस्ती, गणेशखिंड, मांबुर्डा, शियाजीनगर, पुणे | २०९५.२० चौ. मी. | पुर्वेस - ३० फुटी रस्ता |
| | | पश्चिमेस - फा.प्लॉ.क्र. ४६७, शिवाजीनगर |
| | | उत्तरेस - गणेशखिंड रोड |
| | | दक्षिणेस - फा.प्लॉ.क्र. ४६७/६ |

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

सदरचा आदेश हा माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देण्यात आला.

" सत्यप्रत "

उप अभियंता
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे

(कुणाल कुमार)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे

दिनांक -

Scanned with CamScanner